सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २१० | बुधवार, दि. २२ एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





श्री. शैलेश काळकर
अमळनेर



श्री. जितेंद्र गुंजाळ
अमळनेर



श्री. दिपक निकम
अमळनेर

## अमळनेरमध्ये ओव्हरलोड वाहनांचा कहर कायम

# खडीचा सडा, जीव धोक्यात...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरात अवजड व ओव्हरलोड वाहनांचा बेजबाबदार कारभार पुन्हा एकदा उघडकीस आला असून, चोपडा रस्त्यावरील पैलाड ते स्मशानभूमी दरम्यान रस्त्यावर ठिकठिकाणी खडी व वाळू कण साचल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. वाहनांतून गळणारी खडी रस्त्यावर पसरत असल्याने दुचाकीस्वारांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

दररोज या मार्गावरून जाणाऱ्या ओव्हरलोड ट्रक व डंपरमधून खडी खाली पडत आहे तसेच अनेक ठिकाणी रस्ता देखील दाबला गेला आहे. संबंधित प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. चोपडा धुळे मार्गावरील शहरातील शिंदी कॉलनी ते आर.के. नगर दरम्यान प्रत्येक गतिरोधकाजवळ वाळू-सडा पडलेला दिसून येत आहे.

रस्त्यावर विखुरलेली खडी घसरडी ठरत असल्याने लहान-मोठ्या अपघातांची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. विशेषतः सकाळी व सायंकाळी वाहतुकीची वर्दळ असताना परिस्थिती अधिक धोकादायक बनते. पादचारी, विद्यार्थी आणि दुचाकीस्वारांना मोठा त्रास सहन करावा लागत असून, नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. स्थानिकांनी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याने नाराजी वाढली आहे. ओव्हरलोड वाहनांवर तात्काळ कारवाई करून रस्त्याची साफसफाई करावी, तसेच नियमभंग करणाऱ्या वाहनांवर कठोर दंडात्मक कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांनी केली आहे. प्रशासनाने तातडीने लक्ष देणे आवश्यक ही गंभीर बाब लक्षात घेता प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी अन्यथा मोठा अपघात घडल्यास त्याची जबाबदार कोण असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. ▲



*अमळनेर : चोपडा रस्त्यावरील पैलाड ते स्मशानभूमी दरम्यान रस्त्यावर ठिकठिकाणी पडलेली खडी व वाळू. (छायाचित्र : रजनीकांत पाटील)*

## उन्हाचा कडाका वाढला; पारा ४१ अंशांवर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगाव जिल्ह्यात उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून अमळनेर शहरासह ग्रामीण भागात तापमानाचा पारा ४१ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचला आहे. कडाक्याच्या उन्हामुळे नागरिक हैराण झाले असतानाच, आता हवामान विभागाने अवकाळी पावसाचे संकेत दिल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.गेल्या दोन दिवसांपासून तापमानात मोठी वाढ झाली आहे.

सकाळी १० वाजेपासूनच उन्हाच्या झळा लागायला सुरुवात होते, तर दुपारी १२ ते ४ या वेळेत शहरात जणू 'कर्फ्यू' लागल्यासारखी स्थिती पाहायला मिळत आहे. उष्णतेच्या लाटेमुळे नागरिकांनी दुपारच्या वेळी घराबाहेर पडणे टाळले असून, शीतपेये आणि फळांच्या रसाच्या गाड्यांवर गर्दी दिसून येत आहे. एकीकडे सूर्य आग ओकत असतानाच, हवामान विभागाने जळगाव जिल्ह्यासाठी महत्त्वाचा इशारा दिला आहे.

आगामी २४ ते ४८ तासांत जिल्ह्याच्या काही भागांत ढगाळ वातावरण राहून विजांच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवेतील आर्द्रता आणि वाढत्या उष्णतेमुळे स्थानिक पातळीवर पावसाचे ढग तयार होत असल्याचे सांगण्यात येत आहे.सध्या अनेक ठिकाणी पिकांची काढणी आणि मळणीची कामे सुरू आहेत. अशातच जर अवकाळी पाऊस झाला, तर काढणीला आलेल्या पिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ▲

## यात्रेपूर्वी अमळनेरमध्ये नाले सफाईला सुरुवात

### अमळनेर नगरपरिषदेकडून शेकडो टन गाळ उपसा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : संत सखाराम महाराज यात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अमळनेर नगरपरिषदेकडून शहरातील नाल्यांच्या सफाई मोहिमेला वेग देण्यात आला असून आतापर्यंत शेकडो टन गाळ काढण्यात आला आहे. लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर आणि मुख्याधिकारी गणेश शिंदे यांच्या सूचनेनुसार आरोग्य विभागाने ही मोहीम हाती घेतली आहे.

शहरात पिंपळे रोड, पिंपऱ्या नाला, विप्रो नाला, धुळे रोड नाला, गांधीनगर, बालेमिया परिसरासह एकूण पाच मोठे आणि इतर लहान मिळून सुमारे १७ नाले आहेत. यात्रोत्सव काळात भाविक आणि नागरिकांच्या आरोग्याची काळजी लक्षात घेऊन ही स्वच्छता मोहीम यात्रेपूर्वीच राबवण्यात येत आहे.नाल्यांमध्ये साचलेला गाळ, काडी-कचरा, प्लास्टिक पिशव्या, भंगार तसेच तुटलेल्या लाकडी व कापडी वस्तूंमुळे पावसाळ्यात नाले तुडुंब भरून पाणी साचण्याचा धोका निर्माण होतो.

यामुळे दुर्गंधी व जीवजंतू वाढून आरोग्य बिघडण्याची शक्यता असते. यात्रेच्या काळात ही परिस्थिती उद्भवू नये म्हणून आधीच सफाई करण्यात येत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. आरोग्य सभापती रामकृष्ण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य निरीक्षक किरण कंडारे, संतोष जाधव, संतोष माणिक, पर्यवेक्षक श्याम करंदीकर, सतीश बिऱ्हाडे, कुंदन सोनवणे, योगेश पवार यांच्या पथकांनी शहराचे चार विभाग करून नाल्यांतील गाळ व कचरा काढण्याचे काम सुरू केले आहे. तसेच १८ मुकादमांना शहर व परिसर स्वच्छ ठेवण्याच्या सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. पुढील टप्प्यात नदीपात्रातील गाळ काढून परिसर स्वच्छ केला जाणार असल्याची माहिती आरोग्य निरीक्षक किरण कंडारे यांनी दिली. ▲




*अमळनेर : शहरातील नालेसाफसफाईला सुरुवात. (छायाचित्र : रजनीकांत पाटील)*

## अमळनेर येथे कापड दुकानास लागली आग

### अग्निशमन दलाच्या तत्परतेने मोठा अनर्थ टळला

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील व्यापारी संजय मंगलचंद कोठारी यांच्या कापड दुकानासह वरच्या निवासी भागात सोमवारी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागल्याची घटना घडली. दुकानाच्या खाली मोठ्या प्रमाणात कापडाचा साठा असल्यामुळे आग वेगाने पसरून मोठे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली होती.

मात्र अग्निशमन दलाच्या तात्काळ आणि प्रभावी कारवाईमुळे संभाव्य मोठा अनर्थ टळला.व्यापारी संजय मंगलचंद कोठारी यांच्या कापड दुकानासह वरच्या निवासी भागात आग लागली. या घटनेची माहिती मिळताच नगरसेवक गोपी कासार व सुरज परदेशी यांनी त्वरित अग्निशमन दलाशी संपर्क साधला. त्यानंतर अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत वेगाने परिस्थिती नियंत्रणात आणली.

आग आटोक्यात आणण्यासाठी अत्यंत जलद आणि समन्वयाने काम करण्यात आले. या प्रसंगी स्थानिक नागरिकांनीही मोठ्या प्रमाणात मदत करत अग्निशमन दलाला सहकार्य केले. नागरिकांच्या तत्परतेमुळे आग अधिक पसरू न देता नियंत्रणात आणणे शक्य झाले. अग्निशमन अधिकारी गणेश गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचारी दिनेश बिऱ्हाडे, फारुख शेख, जफर पठाण, मच्छिंद्र चौधरी, आकाश संदानशिव, लखन कंखरे व भिका संदानशिव यांनी धाडसी आणि उल्लेखनीय कामगिरी करत संपूर्ण आग विझवली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पुढील तपास सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. ▲



*अमळनेर : व्यापारी संजय मंगलचंद कोठारी यांच्या कापड दुकानासह वरच्या निवासी भागात लागलेली आग आणि झालेले नुकसान.*

## एसपी डॉ.महेश्वर रेड्डी यांची बदली, श्रीकांत धिवरे नवीन पोलीस अधीक्षक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगाव जिल्हा पोलीस दलात नुकताच पदभार हस्तांतरण सोहळा पार पडला. यामध्ये पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांना निरोप देण्यात आला, तर नवनियुक्त पोलीस अधीक्षक श्रीकांत ढिवरे यांनी आज मंगळवारी २१ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता अधिकृतपणे आपला पदभार स्वीकारला.

महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने दिनांक २० एप्रिल २०२६ रोजी जारी केलेल्या आदेशानुसार राज्यातील काही पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील तरतुदीनुसार ही बदली प्रक्रिया राबविण्यात आली आहे. सातारा येथील पोलीस अधीक्षक तुषार दोषी यांची बदली सांगली येथे करण्यात आली असून पुणे येथील पोलीस उप आयुक्त निखिल पिंगळे यांची नियुक्ती सातारा येथे पोलीस अधीक्षक म्हणून करण्यात आली आहे. सांगलीचे पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांची बदली मुंबई येथे राज्य गुप्तवार्ता विभागात पोलीस उप आयुक्त (सुरक्षा) पदावर करण्यात आली आहे.कोल्हापूरचे पोलीस अधीक्षक योगेश गुप्ता यांना गडचिरोली परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक म्हणून (तात्पुरत्या स्वरूपात) जबाबदारी देण्यात आली आहे. गडचिरोलीचे पोलीस अधीक्षक निलोत्पल यांची बदली कोल्हापूर येथे करण्यात आली आहे. तसेच गडचिरोली येथील अपर पोलीस अधीक्षक एम. सेरा यांची पदोन्नतीसह पोलीस अधीक्षक, गडचिरोली म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान, जळगावचे पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी यांची बदली पुणे येथे राज्य गुन्हे अन्वेषण विभागात (CID) करण्यात आली असून धुळेचे पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांची नियुक्ती जळगाव येथे करण्यात आली आहे. पुणे येथील पोलीस उप आयुक्त राजकुमार शिंदे यांची बदली वाशिम येथे पोलीस अधीक्षक म्हणून करण्यात आली आहे. ▲



*अमळनेर : जळगाव जिल्हयाचे नवनियूक्त पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांना डॉ. महेश्वर रेड्डी यांच्या हस्ते पदभार सोपविण्यात आला.*

# चर्चा शून्य, मंजुरी पूर्ण!

## अमळनेर पालिकेची सभा दहा मिनिटांत गुंडाळली; सत्ताधाऱ्यांवर 'पळकुटेपणा'चा आरोप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहराच्या विकासाचे महत्त्वाचे २७ विषय अजेंड्यावर असताना, त्यावर कोणतीही साधकबाधक चर्चा न करता अमळनेर नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा अवघ्या १० मिनिटांत घाईघाईने उरकण्यात आली. सत्ताधाऱ्यांनी विरोधकांच्या प्रश्नांना सामोरे जाण्याचे टाळून थेट सभा संपल्याचे घोषित केल्याने, शहर विकास आघाडीच्या (शवीआ) नगरसेवकांनी हा 'लोकशाहीचा गळा घोटण्याचा प्रकार' असल्याची प्रतिक्रिया दिली आहे.

जळगाव येथे जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या दालनात झालेल्या गंभीर तक्रारींच्या पार्श्वभूमीवर ही सभा गाजण्याची शक्यता असतानाच, सत्ताधाऱ्यांनी बहुमताच्या जोरावर केलेल्या या 'पूर्वनियोजित' खेळीमुळे शहराच्या राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणावर अद्याप प्रशासनाकडून कोणतीही अधिकृत भूमिका स्पष्ट करण्यात आलेली नसल्याने या प्रकारामागील जबाबदारांवर कारवाई, तसेच संपूर्ण प्रक्रियेची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी अशी मागणी शवीआचे व अपक्ष नगरसेवक, राजू फाफोरेकर, भरतकुमार ललवाणी, देवेंद्र कांबळे, सचिन पाटील, सौ स्वप्ना विक्रांत पाटील, योगिता सयाजीराव कापडणे, अफसाना मुक्तार खाटीक, जुबेदाबी हाजी नसीर, कविता विजय राजपूत,शोभाबाई गढरे नंदाताई नरेंद्र संदानशिव, विजय कहारु पाटील, आदींनी केली आहे. ▲




> “ खेळीमेळीच्या वातावरणात बैठक झाली. यात विरोधी नगरसेवकांनी सर्वविषयांना मंजूरी देत बैठक पार पडली. विरोधकांना बोलू दिले नाही व बैठक आटोपली हे खोडसाळपणाचे वृत्त आहे. शहराच्या विकासासाठी सत्ताधारी आणि विरोधक एकदिलाने काम करित आहोत.
>
> **– डॉ. परिक्षित बाविस्कर**
> **नगराध्यक्ष, न. पा. अमळनेर**



हिंदू धर्म पुनरुत्थानाचे जनक : आद्य शंकराचार्य
पान २ वर...

जागतिक पर्यावरण संवर्धनासाठी जागरूकता हवी
पान ३ वर...

भक्ती, समता आणि तत्त्वज्ञानाचा दीपस्तंभ
पान ४ वर...

### दिनविशेष
२२ एप्रिल

- आंतरराष्ट्रीय पृथ्वी दिन
- टेलिफोन वाहतूक सुरू करण्यासाठी ऑप्टिकल फायबरचा प्रथम वापर.
- नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरोलॉजी संचालक डॉ. कल्याण बॅनर्जी यांना विज्ञान आणि तंत्रज्ञानातील ओमप्रकाश भसीन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

## संपादकीय

# वाढते घटस्फोट सामाजिक आव्हान

एकीकडे महिलांच्या आरक्षणावरून गदारोळ सुरू असताना सामान्य स्तरावर आणि त्याही कौटुंबिक स्तरावर महिलांचे संरक्षण हा तितकाच महत्त्वाचा मुद्दा ठरतो आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येमध्ये महिलांची संख्या ६७ टक्के आहे. म्हणजे पुरुष संख्येपेक्षा महिलांची संख्या वाढते आहे. भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच हे सर्वात मोठे परिवर्तन घडून आलेले आहे. आणि इतक्या मोठ्या संख्येने असलेल्या महिलांना कुटुंबांमध्ये आणि समाजामध्ये योग्य तो सन्मान आणि आदर मिळाला पाहिजे ही अतिशय माफक अपेक्षा ठरते. दुर्दैवाने आज महिलांवरच्या गुन्ह्यांमध्ये वाढ होते आहे. शिवाय धक्कादायक भाग म्हणजे कुटुंबांमध्ये घटस्फोटांचे प्रमाण प्रचंड वेगाने वाढत असल्याचे दिसून येते. शहरी भागात हे प्रमाण ३० ते ३५ टक्क्यांपर्यंत जाऊन पोहोचले आहे. तर ग्रामीण भागामध्ये २० टक्क्यांपर्यंत हे प्रमाण आहे. ज्या वेगाने घटस्फोटांची संख्या वाढते आहे ते पाहिल्यानंतर कुटुंबांमध्येसुद्धा महिलांच्या सुरक्षिततेविषयी प्रचंड उदासीनता असल्याचेच म्हणावे लागते. खरेतर ही केवळ उदासीनता नसून तो सर्वात मोठा सामाजिक कलंक म्हणता येतो. आजची महिला शिकली सवरलेली आहे. तिच्याकडे असलेल्या शिक्षणाचा शिवाय इतर गुणांचा योग्य तो आदर व्हावा ही माफक अपेक्षा असते. परंतु वर्षानुवर्षांची पुरुषसत्ताक मानसिकता अजूनही महिलांना ते स्थान द्यायला तयार नाही. विशेषतः शहरी भागातले घटस्फोटांचे हे प्रमाण अत्यंत चिंताजनक ठरते. देशपातळीवर रोज किमान तीनशे ते चारशे घटस्फोटांची प्रकरणं दाखल होत असतात. आणि सरसारी देशपातळीवर रोज शंभर घटस्फोटाच्या घटना घडतात. जागतिक स्तरावर होणाऱ्या घटस्फोटांच्या तुलनेत हे प्रमाण नगण्य जरी ठरत असले तरी भारतासारख्या संस्कृतीप्रधान शिवाय कुटुंब व्यवस्थेचा मजबूत आधार असलेल्या समाजव्यवस्थेसाठी तो एक मोठा इशारा ठरतो. हेच प्रमाण कायम राहिले तर पुढच्या पंचवीस वर्षांत घटस्फोट ही राष्ट्रीय समस्या म्हणूनच विचारात घ्यावी लागेल. सामाजिकदृष्ट्या किंवा समाजव्यवस्थेला धक्का देणारी ही बाब वेळीच विचारात घेतली पाहिजे.

या सगळ्या बदलत्या परिस्थितीत महिलांचे कुटुंबातील आणि समाजातले स्थान टिकविण्यासाठी पुरुषसत्ताक मानसिकता बदलणे गरजेचे ठरते. महिलांकडूनही काहीवेळेला काही प्रकरणांमध्ये गैरसमज आणि हट्टी भूमिकेचा परिणामही घडून येतो. परंतु आजच्या सुशिक्षित आणि तंत्रज्ञानयुक्त जगामध्ये महिलांच्या आदराचा आणि सन्मानाचा विषय अग्रक्रमाने पुढे गरजेचे आहे. जर कुटुंब स्तरावरच तिला डावलले जात असेल किंवा कुटुंबातच तिला योग्य ते स्थान मिळत नसेल तर सामाजिक स्तरावर तिची होणारी अवहेलना वाढण्याचीच शक्यता आहे. आज राष्ट्रीय गुन्हे शाखेच्या अहवालाप्रमाणे संपूर्ण देशभरात महिला अत्याचारांचे प्रमाण सर्वाधिक आहे. अगदी महाराष्ट्रसुद्धा त्यात मागे नाही. संपूर्ण देशपातळीवर गेल्या तीन वर्षात महिलांच्या हत्येच्या प्रमाणामध्येसुद्धा २६ टक्के वाढ नोंदली गेली आणि एकूण अत्याचाराच्या घटनांमध्येदेखील ३० टक्के वाढ झाल्याचे सांगितले गेले. एकीकडे अत्याचाराच्या घटनांत होत गेलेली वाढ तर दुसरीकडे कौटुंबिक पातळीवर महिलांचा होणारा छळ त्यांना दिली जाणारी दुय्यम दर्जाची वागणूक यातून काळ जरी बदलला असला तरी महिलांची सुरक्षितता अजूनही चिंताजनकच ठरलेली आहे. अत्याचाराच्या किंवा घटस्फोटांचे प्रमाण लक्षात घेतले तर महिलांचे समाजातील स्थान भक्कम करण्याच्या दिशेने अधिक ठोस पावलं पडण्याची आवश्यकता वाटू लागते. त्याची सुरूवात व्यक्तीगत किंवा कुटुंब पातळीवरून केली पाहिजे. विशेषतः चोवीस ते तीस या वयोगटात घटस्फोटांचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे आढळून आलेले आहे. अगदी उच्चशिक्षित असूनही समंजसपणाचा अभाव आणि एकमेकांना समजून घेऊन समस्यांचे निराकरण करण्याची क्षमता नसल्याने हे प्रकार वाढत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. भारतासारख्या कुटुंबप्रधान व्यवस्थेला लागलेले हे मोठे गालबोट ठरते. एकमेकांमधील सुसंवाद नसल्याने आणि अतिशय क्षुल्लक कारणांवरून गैरसमज करून घेण्याचे प्रकार आणि उद्भवलेल्या परिस्थितीतून विचारपूर्वक मार्ग काढण्याची तयारी नसते. अहंकार किंवा इगो दुखावल्याने एकमेकांपासून हरकत घेण्याकडे अधिक कल दिसून येतो.

यातला सर्वात वेदनादायक भाग म्हणजे घटस्फोटाच्या घटनेनंतर त्याचे सर्वाधिक परिणाम हे महिलांना भोगावे लागतात. कारण स्वतःचं करिअर सांभाळत असताना सामाजिक स्तरावर स्वतःचा योग्य तो सन्मान ठेवून घेण्यासाठीसुद्धा प्रचंड मेहनत घ्यावी लागते. विशेषतः शहरी जीवनामध्ये घटस्फोटित महिलांना अखंड सावधानता बाळगावी लागते. परिणामी तिच्या वैयक्तीक जीवनामध्ये करिअरबरोबरच स्वतःची सुरक्षितता हा मुद्दा अधिक महत्त्वपूर्ण ठरतो. खरे तर आज महिला पूर्वपिक्षा अधिक सक्षम झालेली आहे. अनेक अर्थानी तिला आत्मनिर्भरही म्हणता येईल. परंतु समाजव्यवस्थेचा विचार करीत असताना आणि आयुष्याचा प्रवास अधिक सुखकर होण्याच्यादृष्टीने तिची सुरक्षितता आणि सन्मान या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. घटस्फोटानंतरचे जीवन निश्चितच कसोटी पाहणारे असते. परंतु यासाठी सामाजिक आणि कुटुंब स्तरावरची पुरुषी मानसिकता बदलणे अधिक गरजेचे ठरते. घटस्फोटासाठी वेगवेगळी कारणं जरी समोर येत असली तरी दोघांच्याही दृष्टीने या प्रसंगाला सामोरे जाणे कठीणच ठरते. सरकारी पातळीवरून या सामाजिक समस्येचा खूप वेगळ्या पद्धतीने विचार करण्याची वेळ आलेली आहे. समुपदेशनापासून तर पुन्हा एकत्र येणाऱ्या कुटुंबांना प्रोत्साहन देण्यापर्यंत अनेक योजना राबविता येऊ शकतात. आज तर अनेक उच्चशिक्षित कुटुंबांमध्ये पैसा किंवा सांपत्तिक स्थिती चांगली असते. परंतु मानसिक स्तरावरचे हे ताणतणाव आणि ओढाताण समाधान मिळू देत नाही हीदेखील वस्तुस्थिती आहे. घटस्फोट ही कौटुंबिक स्तरावर जेवढी समस्या आहे तेवढेच सामाजिक स्तरावर तितकेच मोठे आव्हान ठरते.

# हिंदू धर्म पुनरुत्थानाचे जनक : आद्य शंकराचार्य

**जयंती विशेष**

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

सातव्या शतकात हिंदू धर्माची पुनःस्थापना करणारे, हिंदू धर्माच्या पुनरुत्थानाचे जनक मानल्या जाणाऱ्या आद्य शंकराचार्यांची जयंती २१ एप्रिल रोजी सर्वत्र साजरी करण्यात आली. वैशाख शुद्ध पंचमीला आद्य शंकराचार्यांचा जन्म झाला. अद्वैताचा पुरस्कार आद्य शंकराचार्यांनी सुरू केला. अखिल भारताच्या एकात्मतेची मूर्ती घडविणाऱ्या अद्वैतवादी वैदिक तत्त्वज्ञानी शंकराचार्यांनी भरतखंडाच्या चारही कोपऱ्यात वैदिक धर्माची ध्वजा रोवली. वेदांच्या आधाराने आणि वेदांतसूत्रांच्या पायावर त्यांनी आपले नवीन तत्त्वज्ञान उपदेशिले. भारतात धार्मिक तटबंदी उभारण्याचे ऐतिहासिक कार्य त्यांनी करून दाखविले, असे सांगितले जाते. अलौकिक बुद्धिमत्तेने भारत खंडाला शंकराचार्यांनी हादरवून सोडले. वैदिक धर्माची प्रतिष्ठापना भक्कम पायावर पुन्हा करत, वेद हे ईश्वरप्रणीत आहेत, असे ते म्हणत असत. वेदांताचे तत्त्वस्वरूप समजावून देणाऱ्या तत्त्ववेत्त्यांमध्ये आद्य शंकराचार्यांची योग्यता सर्वश्रेष्ठ दर्जाची मानली जाते.

केरळमधील मलबार प्रांतात पूर्णा नदीकाठी वसलेल्या कालडी ग्रामी इ.स. ७८८ मध्ये शंकराचार्यांचा जन्म झाला. लहानपणीच वडील गेल्याने त्यांची जोपासना त्यांच्या मातेने केली. त्यांच्या वडिलांचे नाव शिवगुरू होते. अध्ययन व अध्यापन यांची एक उज्ज्वल परंपरा त्या घराण्यात चालत आलेली होती. शंकराचार्यांनी आठव्या वर्षी सर्व वेदांचे अध्ययन पूर्ण केले. आईकडून संन्यास घेण्याबद्दल परवानगी मिळवून ते घराबाहेर पडले. मातेवर त्यांचे अतोनात प्रेम होते.

विंध्याद्रीच्या आसपास शंकराचार्यांची गोविंद पूज्यपादाचार्य यांच्याशी गाठ पडली. त्यांनी उपदेश करून



शंकराचार्यांना संन्यासदीक्षा दिली. शंकराचार्यांनी वयाच्या बाराव्या वर्षी सर्व शास्त्रात प्रावीण्य प्राप्त केले. त्यानंतर ते काशी येथे गेले. काशीच्या पंडितांशी धर्मचर्चेवर वाद-प्रतिवाद करून त्यांना आपल्या विद्वत्तेने प्रभावित केले. धर्मावरील वाद-प्रतिवादात ते जिंकले. त्यामुळे त्यांची महती, कीर्ती अतिशय वाढली. आद्य शंकराचार्य एक महान यती, ग्रंथकार, अद्वैत मताचे प्रचारक, स्तोत्रकार होते. या लोकोत्तर कृतीने शंकराचार्य हे जगद्गुरू ठरले.

आद्य शंकराचार्यांनी दोन ते तीन वेळा संपूर्ण भारत पालथा घातला, असे सांगितले जाते. मोठमोठ्या नगरांत आणि तीर्थक्षेत्री जाऊन वैदिक धर्माची पुनर्स्थापना करण्यासाठी शंकराचार्यांनी त्यांच्या शिष्यांसह भारतभ्रमण केले. त्यांना अद्वैत तत्त्वज्ञानाची शिकवण दिली. त्यामुळे पाखंडी आणि वामाचारी संप्रदाय भंगले, अशी मान्यता आहे. आपल्या भारतभ्रमणात शंकराचार्यांनी गोवर्धन पीठ (ओडिसा), शृंगेरी पीठ (दक्षिण देश), शारदापीठ (द्वारका) आणि ज्योतिर्मठ (हिमालय) या चार दिशांना चार पीठांची स्थापना करून शिष्यांना पीठाधिपती म्हणून नेमले. कांचीकामकोटी आणि काशी येथेही त्यांनी पीठे स्थापन केली.

आद्य शंकराचार्यांनी एकेश्वरवादाचा पुरस्कार करत त्याचा अधिक पुरस्कार केला. तणावमुक्त अवस्थेत जगा, पण त्यासाठी मन निर्मळ व निर्भय ठेवा, असे ते नेहमी सांगत. चराचरात परमेश्वर सामावलेला असून त्याचा आदर करायला हवा, अशी त्यांची शिकवण असे. धर्माचा लढा त्यांनी मुद्द्यांनी जिंकला. आद्य शंकराचार्यांनी प्रस्थानत्रयींवर म्हणजेच ब्रह्मसूत्र, उपनिषदे, भगवद्गीता आणि अन्य विषयांवर अनेक भाष्यग्रंथ लिहिले आहेत. त्यांनी तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ, संस्कृत स्तोत्रे, आणि तत्सम काव्ये रचली आहेत. आद्य शंकराचार्यांनी आखून दिलेल्या कार्यपद्धतीनुसारच आजही चारही धर्मपीठांची कामे सुरळीत सुरू आहेत. इतके प्रचंड कार्य आचार्यांनी आपल्या अवघ्या बत्तीस वर्षांच्या आयुष्यात साधले. त्यांच्या विचारधारेचा प्रभाव आधुनिक भारतातदेखील तेवढ्याच तेजाने जाणवत आहे. ते थोर तत्त्वज्ञ, महापंडित, प्रतिभावान कवी, समाजसुधारकांतील अग्रणी आणि चतुर संघटक होते. आचार्यांनी आपले कार्य बौद्धिक, तात्विक आणि धार्मिक या तिन्ही स्तरांवर करून निरनिराळ्या विचारधारांत एकसूत्रता आणण्याचा प्रयत्न केला. लोकजीवनात रूढ असलेले पंथ-भेद नष्ट करून सर्वांना ज्ञानाने मोक्ष मिळू शकतो हे पटवून दिले आणि ज्ञानोपासनेचा मार्ग दाखवून दिला. ▲

# मुडी येथे भरदिवसा चोरी

## चोरीच्या प्रकारामुळे परिसरातील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अमळनेर : तालुक्यातील मूडी गावात भरदिवसा घडलेल्या धाडसी घरफोडीच्या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.गाय माता मंदिर परिसरातील अन्नपूर्णाबाई बडगुजर यांच्या घरावर अज्ञात चोरट्यांनी डल्ला मारत घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि घरातील सुमारे पाच हजार रुपये रोकड लंपास केली. यासोबतच घरातील इतर वस्तूंची तोडफोड करून नुकसान करण्यात आले.ही घटना सकाळच्या सुमारास उघडकीस आली. घराचे कुलूप तुटलेले आणि आतील साहित्य अस्ताव्यस्त अवस्थेत पाहून परिसरातील नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली. प्राथमिक माहितीनुसार चोरट्यांनी घरातील रोकड घेऊन पलायन केल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे, मूडी गावात यापूर्वी अशा प्रकारच्या गंभीर चोरीच्या घटना फारशा घडल्या नसल्याने ही घटना ग्रामस्थांसाठी धक्कादायक ठरली आहे. या घटनेनंतर नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त करत गावातील सुरक्षेच्या उपाययोजना तातडीने मजबूत करण्याची मागणी केली आहे. विशेषतः घराजवळील बंद असलेले रस्त्यावरील दिवे त्वरित सुरू करण्याची मागणी होत असून अंधाराचा फायदा घेतच चोरट्यांनी ही चोरी केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. अशा घटना वेळेत रोखल्या नाहीत तर भविष्यात गुन्हेगारी वाढू शकते. दरम्यान, या घटनेची पोलिसांनी तत्काळ दखल घेऊन तपास सुरू करावा, गावात पोलीस गस्त वाढवावी आणि नागरिकांना सुरक्षिततेची हमी द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# जमिनीचा मोबदला लाटण्यासाठी रचला कट

## ५ संशयितांविरुद्ध पोलिसांत गुन्हा; बनावट कागदपत्रांचा केला वापर

अमळनेर : तालुक्यातील मारवड पोलीस स्टेशनच्या हद्दीत एक गंभीर फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला आहे. मयत आईच्या जमिनीचा ताबा मिळवण्यासाठी आणि शासनाकडून मिळणारा मोबदला लाटण्याच्या उद्देशाने पाच जणांनी संगनमत करून बनावट कागदपत्रे तयार केल्याचे अमळनेर तालुक्यातील बोहरा येथे समोर आले आहे. याप्रकरणी मारवड पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला.रिना रवींद्र पाटील (वय ४३, रा. मलकापूर, जि. बुलढाणा) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ही घटना जून २०१५ पासून सुरू होती. फिर्यादीच्या मयत आई पुष्पाबाई पाटील यांच्या नावावर असलेल्या शेतीवर आपला हक्क असल्याचे भासवण्यासाठी आरोपींनी खोटे कागदपत्र तयार केले. या बनावट कागदपत्रांच्या आधारे आरोपींनी जमिनीचा ताबा मिळवण्याचा आणि सरकारी मोबदला हडपण्याचा प्रयत्न केला. संशयित आरोपींनी स्वतःला कायदेशीर वारसदार असल्याचे दर्शवून सरकारची आणि फिर्यादीची दिशाभूल केली आहे.या प्रकरणात ललिता अशोक पाटील (रा. अमळनेर), सुशील सुरेश मुथा (रा. धुळे), अनिता महेंद्र झावर (रा. जळगाव), नामदेव दगा धनगर (रा. अमळनेर) आणि नथू भोमा धनगर (रा. अमळनेर) या पाच जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक विनोद तोरवणे करत आहेत.

# मद्यपानापूर्वी दारूचे दोन थेंब जमिनीवर का शिंपडतात ?

## अट्टल बेवड्यांनाही माहिती नसेल खरे कारण

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



तुम्ही कधी निरीक्षण केले आहे का? जेव्हा एखादा व्यक्ती दारू पितो, तेव्हा दारू पिण्यापूर्वी तो आपल्या ग्लासातील दारूचे काही थेंब जमिनीवर शिंपडतो. तो असे का करतो? यामागील खरे कारण माहिती आहे का?

तुम्ही कधी दारू प्याले आहेत का? किंवा दारू पिणाऱ्या लोकांसोबत बसला आहात का? जर तुम्ही दारू पिणाऱ्या लोकांसोबत बसला असाल तर त्यावेळी तुम्ही एक गोष्ट नक्कीच नोटीस केली असेल, ती म्हणजे जेव्हा ही लोक दारू पिण्यासाठी बसतात तेव्हा ग्लास भरल्यानंतर दारू पिण्याआधी दारूचे काही थेंब जमिनीवर शिंपडतात. हे लोक असे का करतात? नक्की यामागे काय कारण असू शकते? असा कधी तुम्हाला प्रश्न पडला आहे का? जे लोक पहिल्यांदा हे सर्व पाहतात त्यांना ही गोष्ट नक्कीच विचित्र वाटू शकते. मात्र ही केवळ एक फक्त सवय नाही, तर त्यामागे प्राचीन काळापासून चालत आलेली एक मान्यता आहे. अनेकांना या गोष्टीबद्दल माहिती नसते. मात्र, तरी देखील ते दारू पिण्यापूर्वी ती ग्लासात भरल्यानंतर दारूचे काही थेंब जमिनीवर शिंपडतात आणि मगच दारू पिण्यास सुरूवात करतात.

दारू पिण्यापूर्वी ती जमिनीवर शिंपडणे हा काही नवा ट्रेंड नाही. ही एक खूप जुनी परंपरा आहे. ही परंपरा फक्त भारतामध्येच नाही पाळली जात तर संपूर्ण जगामध्ये तुम्हाला ही गोष्ट पाहायला मिळते. प्रत्येक संस्कृतीमध्ये या कृतीची तुम्हाला वेगळी कथा ऐकायला मिळेल. दारू जमिनीवर शिंपडणे या कृतीचे वेगवेगळ्या देशांत वेगवेगळे अर्थ लावले जातात. जेव्हा एखाद्या व्यक्ती दारू पिण्यासाठी बसतो आणि त्यापूर्वी तो दारुचे काही थेंब जमिनीवर शिंपडतो तेव्हा या कृतींकडे अनेक ठिकाणी अर्पण म्हणून पाहिले जाते. आपण जेव्हा मद्यपानाचा आनंद घेत असतो तेव्हा आपल्यामध्ये एक अदृश्य शक्ती उपस्थित असते. त्याचा नकारात्मक परिणाम आपल्यावर होऊ नये म्हणून दारू पिण्याआधी पहिल्यांदा या अदृश्य शक्तीला दारू अर्पण केली जाते. त्यामुळे दारू पिण्यापूर्वी अनेक जण दारू जमिनीवर शिंपडतात, असे म्हटले जाते. मात्र या गोष्टीला कोणताही आधार नाहीये, ही प्रथा पूर्वीपासून चालत आलेली आहे, ती आजही सुरूच आहे.

काही देशांमध्ये तर दारू पिण्यापूर्वी ती जमिनीवर शिंपडणे हा पूर्वजांना दिलेला सन्मान मानला जातो. काही देशांच्या संस्कृतीमध्ये असे मानले जाते, की आपले पूर्वज हे आपल्यामध्येच उपस्थित असतात. त्यामुळे दारू पिण्यापूर्वी सर्वांत आधी त्यांना दारू अर्पण केली जाते आणि नंतर दारू प्याली जाते. तर काही देशांमध्ये असे मानले जाते, की नकारात्मक शक्तींचा आपल्याला कोणताही त्रास होऊ नये, यासाठी सर्वांत आधी त्यांना दारू अर्पण केली जाते आणि नंतर ती प्राशन केली जाते.


# प्रा. डॉ. प्रभाकर जोशी संपादित संत नामदेव कृत ‘चोवीस नामांचा महिमा’ पुस्तिकेचे प्रकाशन

ग्लोबल महातेज वृत्तसेवा


अमळनेर : श्री संत सखाराम महाराज यात्रोत्सवाच्या प्रारंभावेळी रविवार, दि. १९ एप्रिल रोजी प.पू. संतश्री प्रसाद महाराज यांच्या शुभ हस्ते प्रा. डॉ. प्रभाकर जोशी संपादित व पुण्यातील धार्मिक प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेल्या संत नामदेव कृत ‘चोवीस नामांचा महिमा’ या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. धार्मिक कार्याच्या प्रारंभी भगवान श्रीविष्णूंच्या पवित्र अशा केशव नामावलीचे उच्चारण श्रद्धेने केले जाते. पूजेच्या वेळी चंचल मनाला स्थैर्य शांती व एकाग्रता देण्याचे सामर्थ्य या पवित्र नामावलीत आहे. संत नामदेवांनी या २४ नामांसंदर्भात अभंग रचनाही केली आहे. तसेच या अभंगांचा भावार्थही या पुस्तिकेत दिलेला आहे.

आमदार अनिलदादा पाटील, माजी आमदार शिरीषदादा चौधरी, नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, प्रांताधिकारी मयूर भंगाळे, अमळनेर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते, तहसीलदार रूपेशकुमार सुराणा, पालिकेचे मुख्याधिकारी गणेश शिंदे, संतश्री सखाराम महाराज संस्थानाचे विश्वस्त ॲड. रवींद्र देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. याप्रसंगी या पुस्तिकेचे लेखक प्रा. डॉ. जोशी यांचा सन्मान करण्यात आला.

सदर पुस्तिकेची किंमत ६०




रुपये असून, ती कोणाला हवी असल्यास संतश्री सखाराम महाराज वाडी संस्थानाच्या ग्रंथ भांडारात किंवा मो. : ९९२२२ ४९५९९ वर संपर्क करता येईल. ▲



**अमळनेर : श्री संत सखाराम महाराज यात्रोत्सवाच्या प्रारंभावेळी रविवार, दि. १९ एप्रिल रोजी प.पू. संतश्री प्रसाद महाराज यांच्या शुभ हस्ते प्रा. डॉ. प्रभाकर जोशी संपादित व पुण्यातील धार्मिक प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेल्या संत नामदेव कृत ‘चोवीस नामांचा महिमा’ या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित आमदार अनिलदादा पाटील, माजी आमदार शिरीषदादा चौधरी, नगराध्यक्ष डॉ. बाविस्कर, उपनगराध्यक्ष निकम, प्रांताधिकारी भंगाळे, अमळनेर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी कोते, तहसीलदार सुराणा, पालिकेचे मुख्याधिकारी शिंदे, संतश्री सखाराम महाराज संस्थानाचे विश्वस्त ॲड. देशमुख आदी.**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



जागतिक पृथ्वी दिन विशेष

# जागतिक पर्यावरण संवर्धनासाठी जागरूकता हवी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दरवर्षी २२ एप्रिल रोजी संपूर्ण जगभर जागतिक पृथ्वी दिन उत्साहाने आणि जबाबदारीच्या भावनेने साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश म्हणजे पर्यावरण संरक्षणाबाबत जागरूकता वाढविणे आणि पृथ्वीच्या संवर्धनासाठी ठोस पावले उचलण्यास प्रेरित करणे. आजच्या वेगाने बदलणाऱ्या जगात, औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा अतिरेक वापर यामुळे पृथ्वीसमोरील आव्हाने अधिकच गंभीर होत आहेत.

### पृथ्वी दिनाचा इतिहास

जागतिक पृथ्वी दिनाची सुरूवात १९७० मध्ये अमेरिकेत झाली. पर्यावरणीय समस्या जसे की वायू प्रदूषण, जलप्रदूषण, जंगलतोड आणि जैवविविधतेचा ऱ्हास याबाबत लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी हा दिवस सुरू करण्यात आला. कालांतराने हा उपक्रम जागतिक पातळीवर विस्तारला आणि आज १९० पेक्षा अधिक देशांमध्ये विविध कार्यक्रमांद्वारे साजरा केला जातो.

### सध्याची पर्यावरणीय स्थिती

आज पृथ्वी अनेक गंभीर संकटांना सामोरी जात आहे. हवामान बदलामुळे तापमानात वाढ, अनियमित पर्जन्य, समुद्र पातळीत वाढ यासारख्या समस्या निर्माण होत आहेत. प्लास्टिक प्रदूषण, जंगलतोड आणि जैवविविधतेचा नाश यामुळे पर्यावरणीय समतोल बिघडत आहे. या सर्व समस्यांचा थेट परिणाम मानवाच्या आरोग्यावर, शेतीवर आणि आर्थिक व्यवस्थेवर होत आहे.



### संवर्धनासाठी आवश्यक उपाय

पृथ्वीचे रक्षण करण्यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखणे अत्यंत गरजेचे आहे. काही महत्त्वाचे उपाय पुढीलप्रमाणे–

झाडे लावा आणि जतन करा : वृक्षारोपण हा सर्वांत सोपा आणि प्रभावी उपाय आहे.

